N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** बुलढाणा शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0271 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/03/2023 00:22

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Date From (दिनांक पासून):** 29/03/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/03/2023
   **Time From (वेळेपासून):** 16:38 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:38 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/03/2023 **Time (वेळ):** 00:10 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/03/2023 00:10 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र,बुलडाणाचे आवार मध्ये

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शिवाजी मधुकर शिंगणे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | देउळगांव मही ता देउळगांव राजा ,देउळगांव राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | देउळगांव मही ता देउळगांव राजा ,देउळगांव राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय साहेबराव रिंढे | | | 1. शेलसुर ताचिखली जि बुलडाणा, चिखली,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 6 नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकीकत फिर्याद लाप्रवि बुलढाणा दिनांक 29.03.2023 श्री शिवाजी मधुकर शिंगणे, वय 42 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- कृषी सहायक रा. देऊळगावमही ता. देऊळगावराजा जि. बुलढाणा. मो. 9423105622 समक्ष हजर येवुन तकार देतो की मी वरील प्रमाणे असून वर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो मी 2008 पासून कृषी विभागामध्ये नोकरी करीत आहे सध्या मी वायगाव खु येथे कृषी सहायक या पदावर कार्यरत आहे मी दिनांक 29.03.2023 रोजी सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांचेकडे ग्रामपंचायत देऊळगावमही येथे नेमणुकीस असलेले ग्रामसेवक श्री विजय रिंढे हे आमच्या मौजे देऊळगावमही भाग 1 सर्वे क्रमांक 50/2/ब मधील वडीलोपार्जीत सामाईक शेतजमीनीची ग्रामपंचायत देऊळगावमही येथे बेकायदेशिरपणे 8-अ रजिस्टरला घेतलेली नोंद रद्द करण्याकरीता 3000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे मौजे देऊळगावमही भाग -1 मधील सर्वे क्रमांक 50/2/ब मध्ये आमची वडीलोपार्जित सामाईक क्षेत्र असलेली एकूण 30 आर शेतजमीन आहे सदर शेतजमीन ही चिखली जालना रोडला लागून असल्याने सदर शेतजमीनीवर रोडला लागून आमचे गावातील काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे सदर अतिक्रमण धारकांनी परस्पर ग्रामपंचायत देऊळगावमही येथील तत्कालीन ग्रामसेवक व सरपंच यांना हाताशी धरून आमचे सामाईक क्षेत्राचे जमीनीची कोणतीही एन ए (अकृषक) झालेले नसतांना तत्कालीन ग्रामसेवक यांनी अतिक्रमण धारकांनी अतिकमीत केलेल्या जागेचे आठ अ बाबत बेकायदेशिर नोंद घेतलेली आहे आमचे वरील सामाईक क्षेत्र असलेल्या जमीनीवरील अतिक्रमण धारकानी अतिक्रमीत केलेल्या जागेचे ग्रामपंचायत देऊळगावमही यांनी घेतलल्या बेकायदेशिर आठ अ नोंद ही रद्द करण्यात यावी याकरिता मी गटविकास अधिकारी पंचायत समिती देऊळगावराजा येथे दिनांक 08.03.2022 रोजी रितसर अर्ज सादर केला होता मी 8 अ नोंद रद्द करण्याकरिता दिलेला अर्ज हा ग्रामपंचायत देऊळगावमही यांचेशी संबधीत असल्याने पचायत समिती देऊळगावराजा यांनी ग्रामपंचायत देऊळगावमही येथे सदर अर्ज वर्ग केला होता त्यानंतर मी दिलेल्या अर्जाची ग्रामपंचायत देऊळगावमही येथे जावून ग्रामसेवक श्री. विजय रिंढे यांचेकडे वारंवर चौकशी केली असता ग्रामसेवक रिंढे हे मला उडवाउडवीचे उत्तरे देत होते सदर 8 अ नोंद रद्द करण्यात आली किंवा कसे याबाबत मी दिनांक 28.03.2023 रोजी ग्रामसेवक श्री विजय रिंढे यांची भेट घेवून त्यांना विचारणा केली असता. ग्रामसेवक रिंढे यांनी मला आमचे वरील शेतजमीनीची 8 अ ची नोंद रद्द करण्याकरिता 3000/- रुपये लाचेची मागणी केली त्यावेळी मी रिंढे साहेब यांना पैश्याची व्यवस्था करून उदया भेटतो असे म्हणालो असता ग्रामसेवक रिंढे हे मला म्हणाले की आमचे उदया दिनांक 29-03-2023 रोजी बुलढाणा येथे ग्रामसेवकांचे ट्रेनिंग असल्याने मी उदया बुलढाणा येथे जाणार आहे असे म्हणाले. त्यावरुन मी रिढे साहेब यांना म्हणालो की मला सुध्दा मुलढाणा येथे काम असल्याने मी बुलढाणा येथे येणार असल्याचे सांगितले त्यावर ग्रामसेवक रिंदे हे मला म्हणाले की मग उदया आमचे बुलढाणा येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केद्र येथे येवून भेटा असे सांगितले आहे.तरी ग्रामपंचायत देऊळगावमही येथिल ग्रामसेवक श्री रिंढे यानी माझेकडे मागणी केलेले 3000/- रुपये ही कोणतीही शासकीय फि नसून लोकसेवक श्री रिंढे यांना मला लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नाही तसेच त्यांचा व माझा आपसात कोणताही आर्थीक व्यवहार नसुन आपसी वाद नाही श्री रिंढे. ग्रामसेवक, ग्राम पंचायत, देऊळगावमही यांना माझेकडुन लाच रक्कम 3000/- रुपये स्विकारताना रंगेहात पकडुन कायदेशिर कार्यवाही करावी ही विनती. अशी वरीलप्रमाणे लेखी तकार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांनी मा यंत्र अभियंता चालन राज्य परीवहन महामंडळ बुलडाणा यांचे कार्यालयातील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणून उपलब्ध करुन घेवुन आम्हाला परस्परांचा परीचय करुन दिला त्यानंतर मी दिलेली तकार दोन्ही पंचाना वाचण्यास दिली व माझेकडुन तोंडी कथन करुन घेण्यात आली त्यानंतर दोन्ही पंचापैकी पंचक 1 म्हणून श्री विजय दादाराव वानखडे व पंचक 2 म्हणून श्री देविदास दशरथ जाधव यांची नेमणुक करण्यात आली त्यानंतर पंच कर श्री विजय वानखडे यानी मी दिलेल्या तक्रारीवर त्यांचे स्वहस्ताक्षरात शेरा मारुन दोन्ही पंचानी त्यावर सहया केल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी दोन्ही पंचाना तसेच मला पडताळणी पूर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर

माहीती दिली त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पूर्व पंचनामा करण्यात आला आहे त्यानंतर लोकसेवक श्री विजय रिंढे हे बुलढाणा येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र येथे भेटणार असल्याने पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन मला पंचक श्री विजय वानखडे यांचे सह माझे मारुती सुझकी एस प्रेसो कार क्रमांक एम एच 28 बि.के 6686 ने 13.03 वा ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र बुलढाणा येथे लोकसेवक श्री विजय रिंढे ग्रामसचिव ग्रामपंचायत देऊळगावमही यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे? याबाबत पडताळणी करीता रवाना करण्यात आले त्यावेळी मी व पचक 1 श्री वानखडे असे माझे वरील कारने लाप्रवि कार्यालय बुलढाणा येथून रवाना होवून ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र बुलढाणाचे आवारात पोहचलो त्यावेळी कारमधून उतरुन बाहेर निघालो त्यावेळी मला लोकसेवक श्री विजय रिंढे हे प्रशिक्षण हॉलकडुन येत असल्याचे दिसल्याने मी त्यांना हात दिला त्यावरुन लोकसेवक श्री विजय रिंढे, ग्रामसेवक हे आमचे जवळ आले त्यावेळी मी त्यांचेशी माझे जमीनीची आठ- अ नोंद रद्द करण्याबाबत बोलणी केली झालेल्या बोलणी दरम्यान मी लोकसेवक रिंढे यांना म्हणालो की काय ते तिन देल्याशिवाय जमनारच नाही का? त्यावर लोकसेवक रिंढे हे मला म्हणाले की नाही नाही आले तं बुवा टपाल त सगळीच देवून टाका नं आता जे दयायची आहे ते त्यावेळी मी त्यांना म्हणालो की मह आता हाव कारवाई होईन माझे काम होईन न काम? त्यावर लोकसेवक रिंढे म्हणाले. की काय गोष्ट आहे माऊली, काय ताण हे, ते तिनचा विषय नाही. हे हे दिल्या जाईल न. उदया पुढ आम्हाले बी यावं लागणार हे न त्यावर मी त्यांना म्हणालो की, मंग आजच लागतेत का? त्यावर लोकसेवक रिंढे म्हणाले की काय गोष्ट हे तुम्हाले सांगेल हे बी दयायचे असन त दया नाही त देऊ नका अस काही नाही, त्यावर मी त्यांना म्हणालो की नाही नाही देतोय असे म्हणालो अशाप्रकारे लोकसेवक श्री विजय रिंढे, ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय देऊळगावमही यांनी आमच्या मौजे देऊळगावमही भाग 1 सर्वे कमांक 50/2/ब मधील वडीलोपार्जित सामाईक शेतजमीनीची ग्रामपंचायत देऊळगावमही येथे बेकायदेशिरपणे 8-अ रजिस्टरला घेतलेली नोंद रद्द करण्याकरीता पंच कमांक 1 श्री विजय वानखडे यांचे समक्ष 3000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम घेवुन आजच बोलविल्याने मी व पंच क 1 श्री वानखडे असे अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा येथे परत आलो व पोलीस निरीक्षक इंगळे साहेब व सापळा पथक याना वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगीतली त्यानंतर इंगळे साहेब व सापळा पथकातील सदस्यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषन ऐकून लोकसेयक श्री रिंढे यांची 3000/- रुपयांची लाच मागणी करुन लाचेची रक्कम आजच घेवुन बोलाविले असल्याची खात्री केली त्यानुसार सदर प्रकरणात आपण सर्वानुमते आज दिनांक 29.03.2023 रोजीच सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन लोकसेवक श्री विजय रिंढे ग्रामसेयक यांनी केलेल्या लाच मागणी प्रमाणे त्यांना देण्यासाठी 500/- रुपये दराच्या 6 नोटा असे एकुण 3000/- रुपये इंगळे साहेब यांचेकडे हजर केले त्यावेळी सापळा पथकातील सदस्यानी सदर नोटांचे क्रमांक लिहून अॅन्द्रासिन पावडर लावण्याची कार्यवाही करुन पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी मला व पंच कर श्री विजय वानखडे यांना सापळापूर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवुन त्याबाबतचा सविस्तर सापळापूर्व पंचनामा करण्यात आला. लोकसेवक श्री विजय रिंढे यांचे लाचमागणी वरुन सापळा कार्यवाही करणे असल्याने व लोकसेवक श्री विजय रिढे यांनी लाचेची रक्कम घेवुन बुलढाणा येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र येथे बोलाविलेले असल्याने पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन दिले त्यानंतर मी व पंचक १ श्री विजय वानखडे असे माझे खाजगी कारने सापळा कार्यवाही करीता 15.32 वा रवाना झालो आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, सापळा पथक असे शासकीय वाहनाने बुलढाणा येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राकडे रवाना झाले आम्ही सर्वजण बुलढाणा येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राचे परीसरात पोहोचलो लोकसेवक श्री रिंढे यांचे प्रशिक्षण चालु असल्याने मी व पंचक 1 काही वेळ कारमध्येच थांबून राहीलो त्यावेळी सापळा पथकाचे इतर सदस्य त्यांच्या शासकीय वाहनात थांबुन राहीले त्यानंतर काही वेळाने लोकसेवक श्री रिंढे हे प्रशिक्षणातून बाहेर आले त्यावेळी त्यांना फोन करुन मी आलो असल्याबाबत सांगीतले असता त्यांनी मला गाडीजवळच थांबा दहा मिनीटे असे सांगीतल्याने मी व पंच कर श्री यानखडे असे कारचे बाहेर येवून थांबून राहीलो त्यानंतर थोडया वेळाने लोकसेवक रिंढे हे आमचे कारकडे येताना दिसल्याने मी व पंच असे माझे कारमध्ये जावून बसलो त्यावेळी लोकसेवक रिंढे हे ड्रायव्हर सिटचे बाजुला असलेल्या समोरच्या सिटवर बसले त्यावेळी मी ड्रायव्हर सिटवर तसेच पंच क्रमांक 1 हे मागील सिटावर बसलेले होते त्यावेळी आमचे मध्ये कामासंबधाने बोलणी झाली त्यावेळी लोकसेवक रिंढे यांनी हाताचे बोटे हलवून पैसे देण्याबाबत इशारा केला असता, मी माझे शर्टाचे खिश्यातील लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून लोकसेवक श्री रिंढे यांचे समोर धरली असता लोकसेवक श्री रिंढे यांनी लाचेची रक्कम 3000/- रुपये ही उजव्या हाताने स्विकारले त्यावेळी मी त्यांना मोजुन घ्या तिन हजार आहे असे म्हणून माझे गळ्यातील रुमाल हा तोंडावरुन फिरवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा करताच पोलीस निरीक्षक इंगळे साहेब तसेच सापळा पथकातील कर्मचारी तसेच पंच क 2 श्री जाधव असे ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राचे परीसरात आमची कार उभी असलेल्या ठिकाणी हजर होवुन

लोकसेवक श्री रिंढे यांना कारमधून बाहेर काढून ताब्यात घेतले त्यावेळी पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी स्वतःचा व सापळा पथकाचा परीचय देवुन सदर इसमास त्यांचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विजय साहेबराव रिंढे, वय 50 वर्ष पद ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय देऊळगावमही रा शेलसुर ता चिखली जि. बुलढाणा असे सांगीतले त्यानंतर पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांचे सुचनेवरून पंच क 1 विजय वानखडे यांनी लोकसेवक रिंढे यांनी लाच रक्कम स्विकारुन स्वतःचे नेसत्या शर्टाचे डाव्या बाजुचे खिश्यात ठेवलेली लाचेची रक्कम काढून ताब्यात घेतली असता ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 6 नोटा असे एकुण 3000/- रुपये मिळून आले सदर नोटाचे कमांक व पंच क 2 श्री जाधव यांचेकडे नोंद करुन ठेवलेले नोटाचे कमांक हे एकच असल्याची खात्री करून पोलीस निरीक्षक श्री इंगळे साहेब यांनी लोकसेवक श्री विजय रिंढे यांना माझेकडून 3000/- रुपये लाच रक्कम स्विकारले प्रकरणी ताब्यात घेत असल्याचे सांगून त्यांना रितसर ताब्यात घेवुन झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे तरी लोकसेवक श्री विजय रिंढे, वय 50 वर्ष पद ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, देऊळगावमही रा शेलसुर ता चिखली जि. बुलढाणा यानी आज दिनांक 29-03-2023 रोजी आमच्या मौजे देऊळगावमही भाग 1 सर्वे कमांक 50/2/ब मधील वडीलोपार्जीत सामाईक शेतजमीनीची ग्रामपंचायत देऊळगावमही येथे बेकायदेशिरपणे 8-अ रजिस्टरला घेतलेली नोंद रद्द करण्याकरीता पंच कमांक 1 श्री विजय वानखडे यांचे समक्ष 3000/- रुपये लाचेची मागणी केली त्यानुसार आयोजीत केलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक विजय साहेबराव रिंढे यांनी आज दिनांक 29.03.2023 रोजी 16.38 या दरम्यान ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र बुलढाणाचे आवारामध्ये माझेकडून लाच रक्कम 3000/- रुपये स्विकारली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
PRALHAD KISANRAO KATKAR(I (Inspector)) / BOBN50094 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

HC603
ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** PRALHAD KISANRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN50094